


# डॉ. जयंत नारळीकर

# अपहरण

थोडासा वेगळा प्रयोग या कथेच्या रेखाचित्रांमध्ये करत आहोत. चार वेगवेगळ्या चित्रकारांकडून त्यांना एकमेकांना न सांगता रेखाचित्रे काढून घेतली आहेत. चित्रकाराचा कथेकडे बघण्याचा दृष्टीकोन यामुळे दिसून येतो आणि त्यांच्या चित्रातील वेगळेपणा दिसतो. – संपादक

मुंबईत मुलगी, जावई व नातवंडे यांच्याबरोबर वीकएंड घालवून पुण्यासाठी डेक्कनक्वीन पकडायला मी व्ही.टी. (चुकलो – सी.एस.टी.) स्टेशनच्या आवारात शिरलो तेव्हा ४.५० झाले होते. जरी

स्टेशनवर शांतता नव्हती तरी कारमधून बाहेर पडल्यावर एकदम शांत शांत वाटू लागले कारण शिवम् ड्रायव्हरच्या टकळीतून सुटका झाली. एवढे खरे की मुंबईतल्या महानगरी जीवनाचे अनुभव 'पुणेरी खेडूता'ला ऐकवताना शिवम्ला आपल्या श्रोत्याकडून ''हाँ'', ''हुम्'', फार तर ''असं का?'' अशा ऱ्हस्व उद्गारांपलीकडे कसली अपेक्षा नव्हती. पण त्याची टकळी चालू असतांना मला तरी माझी विचारश्रृंखला चालू ठेवता येत नसे.

माझी लहानशी बॅग हातात घेऊन मी प्लॅटफॉर्मकडे निघालो तेव्हा जाणवले की स्टेशनवर वर्दळ कमी होती. कारण रविवारचा दिवस. पुण्याहून रोज येणारे चाकरमाने नसल्याने डेक्कनक्वीन पण बऱ्यापैकी मोकळी असेल. माझे विचारचक्र चालू ठेवायला अडचण येऊ नये. शेजारी कोणी वटवट्या बसला तर जागा बदलण्याची मुभा असेल. इतक्यात...

'वैज्ञानिक गायब' 'अण्वस्त्रांची गुप्तता धोक्यात' 'घातपाताचा नवा प्रकार?' इत्यादी घोषणा देत एक पोऱ्या दुपारची वृत्तपत्रे विकीत होता. एरव्ही या वृत्तपत्रांत महत्त्वाची माहिती नसते. ती विकत घेतलीच तर मी ती शब्दकोडी किंवा सुडोकू सोडवायला घेत असे. पण पोऱ्याच्या आरोळ्यांनी मला आकृष्ट केले. मी त्याच्याकडे असलेल्या वृत्तपत्राची एक प्रत घेतली, आणि माझ्या C2 डब्यात पदार्पण केले.

बातमी सविस्तर होती आणि मी प्रथम दर्शनी भरभर वाचून काढली. पुन्हा लक्ष देऊन वाचण्याजोगी आहे असे मी ठरवले... पण आधी महत्त्वाचा अजेंडा! पॅण्ट्री कारमधला वेटर आल्यावर मी ऑर्डर दिली ''फ्राईड फिश आणि फ्राईड पोटेटो.'' वेटर ओळखीचा होता आणि मी हीच ऑर्डर देणार हे जाणून होता. तरी उपचार म्हणून त्याने विचारले ''आता लगेच आणू की तासाभराने?'' माझे उत्तर ही त्याला अपेक्षित होते, ''लगेच''!

गाडीने वेग पकडला आणि मी बातमीचा मसुदा पुन्हा वाचायला घेतला.

**वैज्ञानिकाचे अपहरण?**

अणुऊर्जेचा वापर करून क्षेपणास्त्रे तयार करायचे विज्ञान आणि तंत्रज्ञान देशात सर्वप्रथम राबवणारे पण आता निवृत्त झालेले वैज्ञानिक पद्मविभूषण टी. भास्करन् गोपालकृष्णन् आज सकाळपासून अचानक नाहीसे झालेत. या घटनेमुळे तज्ज्ञांच्या वर्तुळात खळबळ माजली असून केंद्रशासनातील उच्च पदस्थांनी चिंता व्यक्त केली आहे.

डॉ. भास्करन् हे मलबार हिलवरील एका फ्लॅटमध्ये राहतात पण सकाळी वरळी सी-फेस वर फिरायला येणाऱ्यांची वर्दळ वाढण्यापूर्वी आपले फिरणे उरकून घ्यावे यासाठी ते रोज पहाटे पाच वाजताच फिरायला येतात. ही माहिती आमच्या बातमीदाराला भास्करन् यांच्या ड्रायव्हरने करामत याने पुरवली. त्याची अर्थातच पोलिसांनी कसोशीने तपासणी केली. त्यातून मिळालेली माहिती अशी-

वरळी सी फेसच्या दक्षिणेकडच्या टोकाला करामतने गाडी पार्क केली आणि नेहमीप्रमाणे भास्करन् फिरायला बाहेर पडले आणि शिरस्त्याप्रमाणे समुद्राच्या काठाने उत्तरेकडे चालत गेले. ते बरोबर ५० मिनिटांनी परत येणार हे करामतला माहीत होते. त्याने कार रेडिओ सुरू केला आणि त्याला आवडणाऱ्या रेडिओ मिर्चीची गाणी (आणि वटवट) ऐकू लागला.

५.४० ला त्याने किनाऱ्याकडे नजर टाकली. दुरून येणारी आकृती आपल्या साहेबांची आहे हे त्याने ओळखले आणि गाणी ऐकायला अजून दहा मिनिटे आपल्यापाशी शिल्लक आहेत ती सत्कारणी लावावीत असे त्याने ठरवले.

पण गाणी ऐकण्यात १० ऐवजी १५ मिनिटे गेली हे त्याच्या नंतर लक्षात आले. ५.५५ झाले, ६.०० वाजले, ६.०५ झाले तरी साहेबांचा पत्ता नाही. किनाऱ्याकडे दूरवर पाहूनसुद्धा दिसले नाहीत. मग ५.४० ते ५.५५ या १५ मिनिटाच्या कालखंडात ते कुठे नाहीसे झाले?

करामतजवळ सेलफोन होता पण भास्करन् स्वतः फोन घरी ठेवून फिरायला जायचे. कारण त्यांना फिरताना कसलाही व्यत्यय खपत नसे. त्यामुळे प्रत्यक्ष जाऊन पाहण्याशिवाय इलाज नव्हता. करामत सावकाश कार चालवत किनाऱ्याजवळच्या रस्त्यावरून टेहळणी करत जाऊन आला, पण त्याला साहेब सापडले नाहीत.

डॉ. भास्करन् विधुर असून त्यांची मुले, एक मुलगा आणि एक मुलगी अमेरिका आणि ऑस्ट्रेलियात असतात. घरी कोणी नसल्याने करामतने प्रसंगावधान राखून वरळी ठाण्यातील पोलिसांकडे वर्दी दिली. लवकरच पोलिसांची तपासचक्रे फिरू लागली- अद्याप फिरत आहेत.

हे वृत्त प्रकाशनाकडे पाठवेपर्यंत भास्करन् कुठे आहेत या प्रश्नाचे उत्तर मिळालेले नव्हते. ते समुद्रात बुडाले ही शक्यता-अपघात किंवा आत्महत्या- त्यांच्या निकटवर्तीयांना अशक्य वाटते. कारण ते स्वत: आयुष्याबद्दल समाधानी होते तसेच सर्व बाबतीत शिस्त आणि सावधगिरी बाळगणारे होते.

पण या पार्श्वभूमीवर त्यांच्या एकाएकी नाहीसे होण्यामागे काय गुपित असावे? अण्वस्त्रे आणि क्षेपणास्त्रे यांवरचा त्यांचा दांडगा अभ्यास लक्षात घेता सुरक्षेच्या दृष्टीने या घटनेला वेगळे महत्त्व येते. सकाळी ही बातमी पसरताच विरोधी पक्षातल्या नेत्यांनी भास्करन् यांना सरकारने पुरेशी सुरक्षा का दिली नाही हा प्रश्न उपस्थित केला आहे.

सुरक्षा पुरवायची तयारी सरकारने दर्शवली होती पण खुद्द भास्करन् यांनी ती झिडकारली होती, हे मला ठाऊक होते. कारण मी भास्करन्च्या निकट वर्तुळातला होतो. एकेकाळी आम्ही दोघे सहाध्यायी होतो. पुढे तो क्षेपणास्त्रांच्या क्षेत्राकडे वळला तर मी शुद्ध विज्ञानाचे क्षेत्र निवडले. पण आमचा संपर्क कायम होता, वृद्धिंगत झाला होता. त्यामुळे या बातमीने मला मोठा धक्का बसला. असा कसा तो एकाएकी नाहीसा झाला?

फ्राईड फिश संपवून व त्यानंतर कॉफी घेऊन मी वृत्तपत्रातील सूडोकूवर लक्ष केंद्रित केले. ते पाचव्या श्रेणीतले, म्हणजे फार अवघड असल्याने मला विचार करावा लागला. पण मन तिकडे लक्ष द्यायला तयार नव्हते. ते सारखे सारखे मला भास्करन्च्या (तथाकथित) अपहरणाकडे आकर्षित करीत होते. असे दोन दिशांना खेचले गेल्याने मनाने पूर्ण असहकार पुकारला. त्यामुळे असो किंवा फ्राईड फिशने जठराग्नि शांत केल्याने असो, मला हळूहळू झोपेची गुंगी जाणवू लागली. नाहीतरी माझी दुपारची छोटेखानी वामकुक्षी नातवंडांच्या मागे धावण्यात चुकली होती. मी केव्हा निद्रादेवीच्या कुशीत शिरलो हे कळले नाही- पण गाडी कल्याण स्टेशन ओलांडून पुढे गेल्याचे स्मरते.

मला जाग आली तेव्हा गाडी कर्जत स्टेशनात उभी होती. मला कोणीतरी जागे करायचा प्रयत्न करत होते. ग्रे सफारी सुटातला एक मध्यमवयीन गृहस्थ मला इंग्रजीत विचारत होता, ''आपण प्राध्यापक काटकर ना?'' त्याच्याशेजारी टी.सी.

आरक्षणाची सूची घेऊन उभा होता. मला वाटले मी या गृहस्थाच्या म्हणजे चुकीच्या जागी बसलो होतो. पण माझे होकारार्थी उत्तर ऐकून तो म्हणाला "साहेब, मी तुम्हाला इथे उतरून घ्यायला आलो होतो. कृपया आपले सामान घेऊन माझ्याबरोबर यावे."

"पण का? मी पुण्याला चाललोय," मी उद्गारलो. तेव्हा त्याने खिशातून एक बिल्ला काढून दाखवला. तो इन्टेलिजन्स ब्यूरोतला अधिकारी होता. नाव राकेश सिंह. "आपल्याला तसदी देत आहे त्याबद्दल आगाऊ क्षमा मागतो. पण आजच्या बातमीला उद्देशून आपणाकडून काही माहिती हवी. मी आपल्याला कारने पुण्याला पोचवीन."

'केव्हा' हे मात्र त्याने सांगितले नसल्याचे माझ्या लक्षात आले. त्याच्याबरोबर जाण्याला पर्याय नव्हता. पुढे तो घरी सोडेल तेव्हा सोडेल. मी घरी कळवायला माझा सेल फोन उघडला. तेव्हा किंचित खाकरून तो म्हणाला "साहेब हा माझ्याकडे असू दे! मी तुमच्या घरी आधीच कळवले आहे की काही अपरिहार्य कारणामुळे तुम्ही आज डेक्कनक्वीनने येत नाही आहात."

"माझी बायको त्यावर काय म्हणाली?"

"साहेब आता उतरा, गाडी निघायची वेळ झाली." टी.सी.च्या आवाहनावरून आम्ही उतरलो. गाडी सुटून दृष्टिआड झाल्यावर मी प्रश्नाचा पुनरुच्चार केला.

"त्यांनी फक्त विचारले, आपण सुखरूप आहात ना, म्हणून." स्मित करत राकेश उद्गारला.

कर्जत स्टेशनच्या आवारात एक लँडरोव्हर उभी होती. ड्रायव्हरने आम्हाला पाहून पटकन बाहेर उडी मारून दार उघडले. आम्ही दोघे मागल्या सीटवर स्थानापन्न झाल्यावर गाडी सुरू झाली. कुठे जायचे याच्या सूचना ड्रायव्हरला आगाऊ दिल्या असणार.

मी पूर्वी कधी कर्जतच्या जवळपास रस्त्याने फिरलो नव्हतो. मुंबई-पुणे रेल्वे प्रवासातले ते एक स्टेशन एवढेच मला माहीत. त्यामुळे रात्रीच्या प्रवासात लहान मोठ्या रस्ते गल्ल्यातून फिरून अखेर एका मोठ्या दोन मजली बंगल्यासमोर आमची गाडी थांबली तेव्हा आपण नेमके कुठे आहोत हे मला सांगता आले नसते.

राकेश पाठोपाठ मी पण बंगल्याच्या पोर्चवरून मुख्य प्रवेशद्वारापाशी पोचलो तेव्हा ते आपोआप उघडले. आम्ही दोघे आत शिरलो तेव्हा माझ्या लक्षात आले की बंगल्याला बेसमेंट पण आहे. कारण आत जेथे वर जाणारा जिना होता तेथेच खाली जाणारा पण होता. राकेशने मला बेसमेंटमध्ये नेले.

"इथे बसा" त्याने एका 'आरामखुर्ची'कडे बोट दाखवले. मी तेथे विराजमान झालो. बहुधा माझ्या 'जबानी'चे संपूर्ण ध्वनिछायाचित्रण लपवलेल्या व्हिडिओ कॅमेराद्वारे केले जाणार. मला का बोलावले असेल याची अंधुकशी शंका माझ्या डोक्यात येऊन गेली. पण मी कसलाही पूर्वग्रह न बाळगता पुढील अनुभवांना सामोरे जायचे ठरवले.

"मी तुम्हाला एक फिल्म दाखवतो. ती पाहिल्यावर मग मी तुम्हाला काही प्रश्न विचारेन..." असे म्हणून राकेशने एक डी.व्ही.डी. समोरच्या उपकरणात घातली. टी.व्ही.च्या पाच-सहापट मोठ्या पडद्यावर फिल्म सुरू झाली.

फिल्मचे शीर्षक होते : "हे लोक कुठे जाऊन आले असावेत?" फिल्मची कॉमेंटरी इंग्रजीत होती, तिचे रूपांतर असे होते...

गेल्या दोन वर्षात जगातल्या अनेक देशातली काही निवडक प्रसिद्ध आणि कर्तबगार व्यक्तींना अनाकलनीय असे अनुभव आले. त्यातील काही इथे पडद्यावर दाखवीत आहोत. अर्थात् ही फिल्म प्रत्यक्ष अनुभवांची नसून ते घडून गेल्यावर त्या त्या व्यक्तींच्या, आणि त्यांच्या निकटवर्तीयांच्या जबानीवर आधारलेली आहे.

क्रमांक एक : सर जोसेफ कोल्डवेल, वास्तुशास्त्रज्ञ.

इंग्लंडमध्ये श्रॉपशर मध्ये बंटिंगफर्ड या खेड्यात बंटिंगफर्ड मॅनर नावाने ओळखल्या जाणाऱ्या मोठ्या घरात राहणारे सर जोसेफ त्यांच्या कामासाठी जगभर हिंडत असतात. वास्तुशिल्पात त्यांनी केलेल्या शोधकार्यामुळे इमारती बांधायच्या विविध प्रकारांसाठी त्यांना युरोप, अमेरिका, एशिया इत्यादींमधील अनेक देशांत बोलावण्यात येते.

अशाच एका दौऱ्यावर ते उझ्बेकिस्तानच्या ताश्कंद गावात एक मोठाली मशीद बांधायच्या प्रकल्पासाठी समरकंदला गेले होते. समरकंद येथील ऐतिहासिक भव्य वास्तू पाहून आपल्याला योग्य ती कल्पना सुचेल असे त्यांना वाटले.

त्यांना खगोलविज्ञानात रस असल्याने पूर्वी १४व्या शतकात उलघ बेग बादशहाने बांधलेल्या वेधशाळेचे अवशेष पहायला जायचा त्यांनी निर्णय घेतला. पण पूर्वीची सर्व उपकरणे आता खलास झालेली पाहून त्यांना वाईट वाटले. ज्या टेकडीवर ही वेधशाळा होती तिच्या माथ्यावर एक म्युझियमवजा लहान इमारत आहे ती बघायला ते तिकडे गेले. त्यावेळी इतर कोणीच टुरिस्ट जवळपास नव्हते, ही नोंद करण्याजोगी गोष्ट आहे.

कारण त्या इमारतीत गेलेले सर जोसेफ बाहेरच आले नाहीत.

(ही माहिती देताना सुरुवातीला सर जोसेफ कोल्डवेल, त्यांचे राहण्याचे ठिकाण, त्यांनी बांधलेल्या इमारती आदी गोष्टी कॉमेंट्री बरोबर दाखवण्यात आल्या. नंतर समरकंदमध्ये कॉमेंट्रेटर फिरत असतानाची दृश्ये होती. म्युझियमवजा इमारतीतून बाहेर पडत तो पुढे म्हणाला...)

दोन तास वाट पाहिल्यावर सर जोसेफच्या ड्रायव्हरला काळजी वाटून तो त्यांना शोधत वेधशाळेच्या परिसरात फिरला. समरकंद येथील मशिदी आणि थडगी पहायला टुरिस्ट गर्दी करतात पण वेधशाळेकडे लोक फारसे फिरकत नाहीत. त्यामुळे सर जोसेफ इथे नाहीत याची खात्री करून घेणे अवघड नव्हते. ड्रायव्हरने सेलफोनवर कार कंपनीच्या मालकाला गाठले. आणि मग पोलिसी तपासचक्रे फिरू लागली. सर जोसेफ ही मोठी असामी असल्याने स्कॉट्लंड यार्ड आणि इंटरपोलला पण पाचारण केले गेले.

पण दोन महिन्यांच्या अपयशी प्रयत्नानंतर ही एक न सुटलेली केस आहे असे तज्ज्ञांनी ठरवल्यानंतर सर जोसेफ एकाएकी अवतरले! समरकंदमध्ये वेधशाळेतल्या त्या इमारतीतून बाहेर पडून ते आपली कार शोधू लागले! मध्यंतरीचा कालखंड जणू झालाच नव्हता. इतके दिवस आपण कुठे होतो याची त्यांना कसलीच आठवण नव्हती.

आजही मधले दोन महिने आपण कुठे होतो... वेगळ्या ठिकाणी होतो तर तेथे कसे गेलो... परत कसे आलो इत्यादी प्रश्नांची उत्तरे त्यांच्याकडे नाहीत.

इथे राकेशने 'पॉज' देऊन माझ्याकडे पाहिले. जणू त्याच्या दृष्टीने न सुटलेला प्रश्न मी सोडवू शकेन! हे सगळे वर्णन ऐकून मी चक्रावून गेलो होतो. इतक्यात या घटनेवर

भाष्य करण्यापेक्षा आपण सगळी फिल्म पाहूया असे मला वाटले. मी खुणेनेच त्याला पुढे जाण्यास सांगितले. राकेशची फिल्म पुढे चालू झाली.

आर्मीनिया देशाकडे आता लक्ष वेधूया. पूर्वीच्या सोव्हिएट युनियनमधला हा देश आता स्वतंत्र असून आपल्या हिमतीवर प्रगती करू इच्छितो. दक्षिणेकडे इराक, पश्चिमेस टर्की, उत्तरेस जॉर्जिया तर पूर्वेस अझरबैझान असे देश शेजारी म्हणून त्यांच्या आक्रमकतेला तोंड देऊन आर्मीनिया स्वत:ची अस्मिता टिकवून आहे. येथील खगोल वेधशाळेची परंपरा अंबार्त्सुमियान या प्रख्यात शास्त्रज्ञाने विकसित केली. त्याच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल सोव्हिएट काळात मॉस्को-मधील राज्यकर्त्यांना देखील आदर होता.

अंबार्त्सुमियानच्या जन्मशताब्दी उत्सवात, एका सार्वजनिक समारंभात समाजातल्या विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्याला आदरांजली वाहिली. त्यामध्ये वैद्यकीय क्षेत्रातील प्रख्यात न्यूरोसर्जन सेड्रिकियान् यांनी लहानसे भाषण केले.

या कार्यक्रमासाठी सेड्रिकियान् यांची निवड होणे स्वाभाविक होते. अंबार्त्सुमियान्ने स्वत:ला लाभलेल्या प्रतिष्ठेचा उपयोग अनेक विधायक कार्यांसाठी केला त्यांत वैद्यकीय क्षेत्र प्रामुख्याने होते. खुद्द सेड्रिकियान् सारख्या प्रतिभावंताला दुर्मीळ यंत्रसामग्री उपलब्ध करून देण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. त्यामुळेच सेड्रिकियान्ला आपल्या क्षेत्रात आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळवता आली.

त्या दिवशीचे त्यांचे भाषण कमालीचे प्रभावशाली झाले. आपल्या लहान देशाला परस्पर सहकार्याने उच्च पातळी गाठता येईल हा अंबार्त्सुमियान् यांचा विश्वास सेड्रिकियान् यांनी विशद करून सांगितला. त्यांच्या भाषणाला प्रचार-माध्यमांनी पुष्कळ प्रसिद्धी दिली.

पण दुर्दैवाने हे त्यांचे शेवटचे भाषण होते काय असे आता वाटू लागले आहे. कारण येराव्हानच्या प्रख्यात प्रेक्षागारातले आपले भाषण संपवून समारोपापर्यंत न थांबता ते तेथून बाहेर पडले. तत्पूर्वी कोणीतरी त्यांना एका पाकिटातून काहीतरी संदेश पाठवला होता एवढीच माहिती उपलब्ध होती. खुद्द हे पाकीट सेड्रिकियान्कडे पोचवणाऱ्या प्रेक्षागारातल्या शिपायाला देखील याहून जास्त सांगता आले नव्हते. पण त्या पाकिटातील संदेश वाचून मात्र सेड्रिकियान् फार क्षुब्ध झाल्याचे व्यासपीठावर त्यांच्या शेजारी बसलेल्या वक्त्याने सांगितले. काही काळ चुळबुळ करून शेवटी ते तेथून बाहेर पडले.

त्यानंतर रस्त्यावरच्या काही लोकांनी त्यांना प्रेक्षागारातून जवळच्या मेट्रो स्टेशनमध्ये जाताना पाहिले. त्यांचा चेहरा बहुजनपरिचित असल्याने त्यांना मेट्रो स्टेशनमध्ये शिरताना, फार काय भुयारी रेल्वेतून प्रवास करताना पाहिलेले 'साक्षीदार' मिळाले.

'साक्षीदार' शब्द वापरण्याचे कारण की तेथून सेड्रिकियान् कुठे गेले हे अद्याप न उलगडलेले कोडे आहे. ते पार नाहीसे झाले आणि त्यांच्या शोधतपासकार्यात पोलिसांना वरील व्यक्तींची साक्ष उपयोगी पडली. येराव्हानसारख्या राजधानीच्या शहरात भरगर्दीत सेड्रिकियान् सारखी प्रसिद्ध व्यक्ती अशी एकाएकी नाहीशी होऊ शकते ही खरोखर आश्चर्याची गोष्ट होती.

पण ही गोष्ट इथे संपत नाही. दोन महिन्यानंतर, पोलिसांनी आशा सोडली असता सेड्रिकियान् एकाएकी प्रकट झाले. ते ज्या मेट्रो लाईनवर अदृश्य झाले होते तेथेच ते पुन्हा अवतरले. आणि गाडीतला प्रवास चालू ठेवला. दोन महिन्यांपूर्वी ज्या स्टेशनातून बाहेर पडायचा त्यांचा इरादा होता तेथूनच ते बाहेर पडले... जणू मानसपटलावरची त्यांची विचारश्रृंखला जशीच्या तशी शाबूत होती.

आणि पुढे असे दिसून आले की त्या दोन महिन्यांच्या काळात आपण काय केले, कुठे होतो, कोणाला भेटलो याची कसलीच आठवण सेड्रिकियान् यांना नव्हती. आपण दोन महिने नाहीसे झालो ही कल्पनाच त्यांना पटत नव्हती. पण अखेर कॅलेंडर पाहून ती त्यांनी मान्य केली.

आता सर्व स्थिरस्थावर झाले असले तरी या प्रश्नाचे उत्तर अद्याप आपल्याकडे नाही, 'सेड्रिकियान् कुठे अदृश्य झाले होते?'

चित्रफीत पुढे चालू होती. पण माझ्या मनात वेगळेच विचारचक्र चालू झाल्याने माझे पूर्ण लक्ष पडद्यावर केंद्रित नव्हते...

प्रख्यात जपानी पुरातत्व संशोधक तोशिरो हासेगावा अनेक वर्षांनी मेक्सिको सिटी जवळचे पिरॅमिड पाहायला येत होते. पूर्वी त्यांनी येथे उत्खननात सापडलेल्या अवशेषांवर शोधनिबंध लिहिले होते. पण अलीकडे येथील पुराणवास्तूंच्या वयाबद्दल वाद निर्माण झाल्याने त्यांनी ही पुनर्भेट योजिली होती. त्यांच्याबरोबर मेक्सिकोमधील पुराणवास्तूंचे तज्ज्ञ टोनाट्यू सॉमॉस आले होते.

''आपल्याला हा पिरॅमिड चढून वर गेले पाहिजे'' त्यांनी तोशिरोंना सांगितले. ही सत्तरी ओलांडलेली व्यक्ती खरोखर ठरल्याप्रमाणे तपासणीसाठी वर चढेल का? त्यांच्या शंकेला सत्वर दूर करत तोशिरो म्हणाले ''अवश्य! पण चाळीस वर्षांपूर्वीचा वेग मला गाठता येणार नाही. अर्थात वेळेपेक्षा उद्दिष्ट गाठणे महत्त्वाचे. चला...''

आपला कॅमेरा सरसावून तोशिरो त्या भक्कम पायऱ्यांवर चढू लागले. दर दहा पायऱ्यांवर थांबून फोटो घ्यायचे; किंवा काही वेळ बसून नोट्स काढायच्या. त्यांना गुरुवत् मानणारे बरोबरचे टोनाट्यू गप्प होते... तोशिरोने काही म्हटले तर प्रतिसाद देण्यापुरते बोलत. क्रमाक्रमाने वर चढत पन्नास मिनिटात ते वर पोचले. तोशिरो यांनी काही छोटाली तपासणी यंत्रे आणली होती. त्यांचा आणि खास कॅमेराचा वापर करत त्यांनी तपासणी सुरू केली.

टूरिस्ट सीजन संपला असल्याने गर्दी नव्हती. फार काय वरचा शेवटचा 'मजला' गाठणारे दोघे तिघे तरुणच तेथे होते. उगीच तोशिरोच्या कामात व्यत्यय नको म्हणून टोनाट्यू वरच्या भागात चक्कर मारायला गेले. ''जरूर असेल तेव्हा मला हाक मारा. मी इथे जवळच आहे.'' टोनाट्यूच्या आवाहनाला केवळ हात वर करून तोशिरो यांनी प्रतिसाद दिला. इतके ते स्वत:च्या निरीक्षणात गुंतले होते. थोडे अंतर चालून गेल्यावर टोनाट्यूने वळून पाहिले. तोशिरो आकाशाकडे तोंड करून विचारमग्न बसलेले दिसले. तेच त्यांचे शेवटचे दर्शन ठरणारे होते.

कारण अर्ध्या तासांनी टोनाट्यूला वाटले आता परत जाऊन पहावे तोशिरोंना कसली गरज आहे का ते. पण परतल्यावर त्याला तोशिरो कुठेच दिसेनात. त्यांचा कॅमेरा दगडावर ठेवलेला होता. पण यंत्रसामग्री किंवा खुद्द तोशिरो यांचा पत्ता नव्हता.

''असतील इथे कुठेतरी... इथून जाणार तरी कुठे?'' स्वत:शी पुटपुटत टोनाट्यूने खाली नजर टाकली. पिरॅमिडच्या पायऱ्या दिसत होत्या, त्यावर चढणारे उतरणारे टूरिस्ट होते पण तोशिरो महाशय मात्र त्यांत दिसले नाहीत.

टोनाट्यूने मोबाईल फोन लावून बघितला. तोशिरोंचा फोन 'आउट ऑफ रिच' आहे एवढेच त्याला समजले. अखेर त्याने एमर्जंसीत पोलिसांचा नंबर लावला. आंतराष्ट्रीय ख्यातीची ही व्यक्ती बेपत्ता झाल्याचे सांगितले. त्या भागातले एक पोलीस इन्स्पेक्टर जिने चढून वर आले. आणि आसपास नजर टाकून अविश्वासाच्या सुरात म्हणाले ''ही जागाच अशी आहे की इथून माणूस पळून जाऊ शकत नाही की पळवला जाऊ शकत नाही. तेव्हा प्रोफेसर साहेब आपण रिकाम्या पोटी काही पिऊन तर आला नाहीत ना?''

टोनाट्यूच्या ही लक्षात आले आपण सांगतो ती गोष्ट किती असंभाव्य आहे. पण मग त्याच्याजवळच्या कॅमेऱ्याची त्याला आठवण झाली. त्याने तो पुढे करून म्हटले ''हा पहा खास बनावटीचा कॅमेरा. यावर तोशिरो हासगोवा यांचे नाव पण आहे. हा त्यांचा वापरातला कॅमेरा इथे कसा आला?''

कॅमेऱ्यावर एक पट्टी चिकटवली होती. त्यावर तोशिरोंचा नाव आणि पत्ता होते. त्यातील घेतलेले फोटो आज इथूनच घेतले हे त्यांवरील तारखेतून स्पष्ट होत होते. पोलीस इन्स्पेक्टर साहेबही डोके खाजवू लागले ''एक वयोवृद्ध व्यक्ती अशा दुर्गम ठिकाणाहून दिवसाढवळ्या अदृश्य कशी होऊ शकते?''

• • •



चित्रफीत पुढे चालू झाली पण तिच्यातला घटनाक्रम आता माझ्या लक्षात आला. विविध क्षेत्रातील मान्यवर, कर्तबगार व्यक्ती एकाएकी अदृश्य होत होत्या. त्यापैकी काही व्यक्ती (सुरुवातीला वर्णन केलेल्या) काही काळाने प्रकट होत. त्यांना कसलीही इजा झालेली नसे. पण दरम्यानच्या कालखंडात आपण कुठे होतो हे त्यातल्या एकाही व्यक्तीला सांगता येत नसे. त्या कालखंडाची स्मृती त्यांच्या मेंदूच्या पटलावरून पूर्णपणे पुसली जात होती.

नंतरच्या यादीतल्या व्यक्ती अदृश्य झालेल्या परतल्या नव्हत्या. बहुतेक त्यांचा अपहरणकालाचा अवधी अजून पुरा झाला नव्हता. म्हणून त्या सर्व व्यक्ती योग्य वेळी 'परत' येतील अशी राकेशची अपेक्षा होती आणि मलाही त्याचा हा आशावाद संयुक्तिक वाटला. त्या यादीत आज भास्करन् यांचा समावेश करावा का? या प्रश्नावर जरी आम्हा दोघांचे होकारार्थी मतैक्य होते तरी तसा निष्कर्ष काढण्यापूर्वी एक दोन दिवस थांबावे असे आम्ही ठरवले.



प्रा. अनंत कुलकर्णी

"असे हे बारा लोक अदृश्य झाल्याचे आमच्या डेटाबेसमध्ये तूर्त आहे, भास्करन् धरून" फिल्म संपल्यावर राकेश म्हणाला.

"तुमचा डेटाबेस अपूर्ण असण्याची शक्यता आहे, म्हणजे याहून जास्त संख्येने प्रतिभावंतांचे अपहरण झाले असेल : फक्त ती बातमी तुमच्यापर्यंत पोचली नसेल." राकेशने समोर ठेवलेल्या कपातली कॉफी घेत मी म्हटले. तत्पूर्वी फिल्म बघता बघता राकेशने मागवलेल्या सॅण्डविचेस आणि खेकडा भज्यांचा मी यथास्थित समाचार घेतला होता... कारण फ्राईड फिश खाऊन साडेचार तास झाले होते.

"अर्थातच सर्व पर्याय खुले ठेवणे शहाणपणाचे ठरेल." कॉफीचा घोट घेत राकेश पुढे म्हणाला. "पण काटकर साहेब, तुम्ही म्हणता तसे घडले असल्याची शक्यता फार कमी आहे. आम्ही जगातल्या बहुतेक देशातल्या गुप्तचर यंत्रणांशी संपर्क ठेवून आहोत, अगदी पाकिस्तानच्या आय.एस.आय. आणि चायनाच्या मिनिस्ट्री ऑफ स्टेट सिक्युरिटीशी देखील. त्याशिवाय आमची माणसे पण देशोदेशी पेरलेली आहेत. त्यातून या सर्व व्यक्ती आंतराष्ट्रीय ख्यातीच्या आहेत आणि आपापल्या देशात त्यांच्या पाठीशी प्रचंड प्रतिष्ठा असलेल्या अशा आहेत. त्यांचे एकाएकी अदृश्य होणे प्रसिद्धी माध्यमांच्या काकदृष्टीतून सुटणार नाही."

राकेशचा युक्तीवाद पटण्यासारखा होता. त्याने पुरविलेल्या माहितीनुसार खालील विधाने करता येत होती:-

१) काही निवडक कर्तबगार व्यक्ती अचानक अदृश्य होत होत्या.

२) त्या अमुक एका देशातल्या नसून जगातल्या विभिन्न राष्ट्रातल्या होत्या.

३) प्रत्येक व्यक्ती स्वत:हून नाहीशी होते का तिला दुसरे कोणी नाहीसे करतात हे अद्याप कळू शकले नव्हते.

४) जरी या दुसऱ्या प्रकारात बसणाऱ्या घटना होत्या असे मानले तरी हे सामान्य अपहरण (किड्नॅपिंग) नव्हते. कारण त्या व्यक्तिला 'मुक्त' करण्यासाठी मागण्या केल्या गेल्या नव्हत्या. किंवा अमुक एका संघटनेने अपहरणाची जबाबदारी घेतली नव्हती.

५) अपहरण किंवा स्वेच्छेने अदृश्य होणे यातील कुठलाही पर्याय निवडला तरी त्यावरून काही ठराविक काळानंतर ती व्यक्ती पुन्हा प्रकट होते यामागची भूमिका काय असावी?

६) प्रकट झाल्यावर त्या व्यक्तीच्या स्मृतिपटलावर अदृश्य असतानाचे कुठलेच अनुभव वा आठवणी नसाव्यात ही सर्वात आश्चर्याची गोष्ट म्हटली पाहिजे. 'हे घडलेच नाही' असे म्हणत ती व्यक्ती आपले आयुष्य पूर्ववत चालू ठेवते ते कशामुळे?

भास्करन् नेमके अदृश्य झाले ती जागा शोधण्यात राकेशला यश आले होते.

रात्रीचे बाराचे ठोके ऐकू आले. एरव्ही मी रात्रीचे साडे नऊ-दहा वाजले की पेंगायला लागतो. पण त्या रात्री झोप हा प्रकारच मी विसरून गेलो होतो. राकेश आणि मी जणू काय एका खेळात गुंतलो होतो. एकाने या प्रकरणाची कारणमीमांसा करायची तर दुसऱ्याने ती खोडून काढायची. पण आम्हा दोघांपैकी एकालाही पूर्णपणे समाधानकारक कारणमीमांसा करता येत नव्हती.

एकंदरीत विचार करताना मला आर्थर कॉनन डॉयेल या रहस्यकथा लेखकाच्या गोष्टीतला शेरलॉक होम्स या चरित्रनायकाचे वाक्य सतत मनात येत होते. गुन्हे सोडवण्यात अद्वितीय गणल्या जाणाऱ्या होम्सने एका प्रसंगी उद्‌गार काढले होते, 'सगळे पर्याय खोडून काढल्यावर मग जे काही उरते ते कितीही असंभाव्य वाटले तरी ते सत्य असले पाहिजे.'

'सगळे पर्याय' म्हणजे 'यांना आपण पाहिलेत का?' पासून धर्माच्या नावाखाली दहशतवादी अपहरणे. या 'सगळ्या पर्यायां'चा विचार करून देखील राकेशसारख्या अनुभवी व्यक्तीला कळत नव्हते, 'असंभाव्य' म्हणजे कुठला पर्याय?

"काटकर साहेब, मला आशा आहे की चाकोरी बाहेर जाऊन विचार करण्याची क्षमता असलेल्या आपल्या मेंदूला हा असंभाव्य पर्याय सुचेल" राकेश म्हणाला. त्याच्या बोलण्याच्या पद्धतीवरून मला जाणवले की जरी सौम्य आणि सभ्य शब्दांचा हा मुबलक वापर करतोय तरी त्यामागे कडकपणा लपलेला आहे. एक दृढनिश्चय आहे की या प्राध्यापकाकडून काहीतरी नवी कल्पना मिळवायची. त्याशिवाय त्याची सुटका नाही!

पण अशा कल्पना मला तरी कुठून मिळणार? यासाठी वास्तवापासून विज्ञानकथा विश्व धुंडाळले पाहिजे. मी आर्थर सी. क्लार्क, आयझॅक असिमॉव्ह, रे ब्रॅडबरी सदृश विज्ञानकथा धुरंधरांच्या कार्याचा मनोमन आढावा घेतला. पण त्यांच्या गोष्टींत सध्याच्या पेचावर उपाय नव्हता. नाही म्हणायला भुक्कड विज्ञानकथांमध्ये पुष्कळ पर्याय मिळाले असते. मी तसे राकेशला बोलून दाखवले तेव्हा तो हसला आणि म्हणाला "उडत्या तबकड्या, बर्म्यूडा त्रिकोण आदींवर प्रसिद्धी माध्यमांनी पुष्कळ खाद्य मिळवले होते. त्या जंक फूडने जिभेचे चोचले पुरवले जातात पण स्वास्थ्यलाभ होत नाही. पुष्कळदा हे तथाकथित साहित्यकार विज्ञानाचे वर वर वाचन करून काहीतरी चितारतात... कृष्ण विवर, कृष्ण पदार्थ, प्रकाशाहून अधिक वेगाने धावणारी याने, क्लोनिंग करून मिळणाऱ्या प्रतिकृती, अंतराळात फिरणारे सूक्ष्म जीव... या कल्पनांत विज्ञान कुठपर्यंत जाते आणि वास्तव काय असावे या बाबत अशा लेखकांचा मानसिक गोंधळ असतो. अर्थात् अशा गोंधळावर आधारलेले लेखन कसे असेल याची कल्पना करणे अवघड नाही... "काय काटकर साहेब, असे एकाएकी का उठलात?"

विचार करत असताना माझे लक्ष फरशीकडे गेले. तेथे मुंग्यांची रांग चाललेली होती. एरव्ही खोलीत सर्वत्र टापटीप असताना या मुंग्या कुठून उपटल्या? बहुतेक कुठेतरी साखर पडली असेल ती टिपायला आलेल्या दिसतात. का, कोण जाणे पण त्यांचे अस्तित्व माझ्या विचारश्रृंखलेला उगीचच छेद देतेय असे वाटले.

"त्या मुंग्या कुठून आल्या?" मी जरा चिडून विचारले.

"मुंग्या?" आश्चर्याने राकेश उद्‌गारला. हा प्रश्न मी का उपस्थित केला? का या प्रकरणाच्या प्रेशरमुळे मनाचा समतोल मी गमावीत आहे? बहुतेक हा शेवटचा पर्याय विचारात घेऊन तो म्हणाला "काटकर साहेब, हा मेंटेनन्सचा प्रॉब्लेम आहे. फरशीला, भिंतीला भोके पडलीत. बहुतेक या मुंग्यांनी कुठेतरी वास्तव्य केले असेल आणि त्यांना खाद्याचा सुगावा लागला असेल."

मला ही वाटले आपण उगीच कातावलो. स्वत:ला सावरीत मी पुन्हा विचार करू लागलो. अदृश्य होण्यामागची कारणे काय असू शकतात? वास्तविक मी काही गुप्तहेरगिरीचा अनुभव घेतला नव्हता. मला वैज्ञानिक म्हणून पर्याय सुचवायचा होता. पण सुचत नव्हता.

मुंग्यांची रांग आता कमी लांब झाली होती. एका ठराविक जागेपर्यंत जाऊन तेथेच

संपत होती. उगीचच माझे लक्ष तिकडे जात होते. या मुंग्या नसत्या तर आपण सरळ विचार करू शकलो असतो.

तिकडे राकेशची टकळी पण चालू होती. तो आता सरकारी मेंटेनन्सवर टीका करत होता. त्यामुळे मुंग्या, डास आदी सर्रास वास्तव्य करून आहेत त्याचे रसभरीत वर्णन करीत होता.

राकेशचे हे विचारमंथन चालू असता त्याच्या एका भागाने माझ्या मनात ट्यूबलाइट पेटली. हाच का तो असंभाव्य पर्याय? छे! आपण विज्ञान कथांच्या जंक फूडच्या आहारी तर जात नाही?

मी राकेशला खुणेनेच गप्प राहण्याची सूचना दिली, आणि त्या प्रशस्त खोलीत येरझारा घालू लागलो. मूळ कल्पना इतकी अफाट होती की ती मांडायला मलाच लाज वाटत होती. पण ती गृहीत धरली तर बरेच रहस्य 'सुटत' होते. अपहरण झालेले लोक असे एकाएकी अदृश्य का होत होते? पुन्हा 'जैसे थे' अवस्थेत प्रकट कसे होत होते? त्यांच्या विस्मृतीपर्वाचा अद्याप अर्थ लागत नव्हता पण लागेल असा एक प्रकारचा आत्मविश्वास मनात होता.


माझे येरझारा घालत फिरणे चालू होते तोपर्यंत राकेश गप्प होता. मी येरझारा पूर्ण करून खुर्चीवर बसलो आणि त्याच्याकडे पाहून स्मित केले तेव्हा तो उद्गारला :

"यूरेका?"

"होय! जवळजवळ तशीच स्थिती आहे. पण तत्पूर्वी एक प्रयोग करता आला तर पाहूया! मी तपशील देतो."

राकेश आणि मी त्याच्या गाडीने मुंबईकडे भरधाव वेगाने निघालो होतो. मला जी भन्नाट कल्पना सुचली होती ती मी स्वत:शीच मांडून तपासली होती. तर्कशास्त्रात ही कल्पना निर्दोष असली तरी ती पटणे- किंवा दुसऱ्याला पटवणे- मात्र अवघड, नव्हे अशक्य होते. पण जर तिचे प्रात्यक्षिक करून दाखवता आले तर मात्र शंकेखोरांची तोंडे बंद झाली असती. हे प्रात्यक्षिक करायला, सुदैवाने, मला फार दूर जावे लागणार नव्हते.

सकाळी पाचच्या आत मला वरळी सी फेस गाठायचा होता. पुष्कळ तपासणीनंतर मिळालेली, ज्या जागेवरून भास्करन् अदृश्य झाले तिथे पोचायचे होते. शक्यतो ५.५० पूर्वी. कारण राकेशच्या (आणि मुंबई पोलिसांच्या) तपासणीत ही वेळ अदृश्य होण्याचा काळ म्हणून निश्चित करण्यात आली होती.




सुदैवाने वाटेत ट्रक्सचा मर्यादित ट्रॅफिक होता. त्यामुळे कसलाही खोळंबा न होता आम्ही सव्वाचार वाजता फ्लाय ओव्हरवरून चेंबूरमध्ये शिरलो.

"हाऊ आर वी डुइंग?" या राकेशच्या आवाहनाने मी पेंगणे थांबवून खडबडीत जागा झालो. त्याने पुढे केलेल्या ग्लासात गरम गरम चॉकलेट ड्रिंक होते. थर्मासमधून आणलेले ते पेय त्याने ड्रायव्हरला दिले तसे आम्ही देखील घेतले.

तरतरी येऊन मी वरळी केव्हा येते ते पाहू लागलो. पूर्वेपासून पश्चिमेकडे जायला निव्वळ वीस मिनिटे पुरली. आणखी बारा तासांनी हेच अंतर तासाभरात सर करता आले म्हणजे मिळवली. भास्करन्चा ड्रायव्हर जेथे गाडी पार्क करीत असे, तेथेच राकेशने गाडी थांबवली. आम्ही तिघे

उतरलो. पण पुढची वाट आम्हा दोघांनाच घ्यायची होती.

घटनेची पुन्हा जुळवणी करीत आम्ही चाललो होतो. त्या वाटेने फिरायला येणारे अजून वीस पंचवीस मिनिटाने येतील असे राकेश पुटपुटला. झुंजुमुंजु होत आले, आता उष:काल लवकरच. मला मात्र 'तो स्पॉट' पहायची घाई झाली होती.

''राकेश मी आशा करतो की हा एक जंगली बदकाचा पाठलाग ठरणार नाही.'' मी हसत म्हटले. वास्तविक हे माझ्यातील आत्मविश्वास झाकायला ओढून ताणून आणले होते. आतापर्यंत कसल्या खुळचट कल्पनेचा पाठपुरावा करत आपण इथे आलो असे मला वाटू लागले होते. या डाउन टू अर्थ शहरात अद्भुत घडले कसे?

पण मला इतर घटनांची आठवण किंचित प्रोत्साहन देत होती. थोडक्यात...

* सर जोसेफ कोल्डवेल अदृश्य झाले ती जागा सामान्य होती...

* सेड्रिकियान हरवले ते मेट्रो स्टेशन जनसामान्यांच्या वर्दळीचे नव्हते का?...

* मेक्सिको सिटीबाहेरच्या पिरॅमिडच्या माथ्यावर कितीतरी टूरिस्ट जातात...

* रियो द जॅनिरोच्या कोपाकबाना बीचवर अदृश्य झालेले संख्याशास्त्रज्ञ कोमारोव्ह,

* शांघाईच्या मोठ्या शॉपिंग सेंटरमधून नाहीसे झालेले फांग ली हे खगोल निरीक्षक.

* ख्राइस्ट चर्चपासून हायकिंगला निघालेले प्रख्यात अर्थशास्त्रज्ञ रॉय फॉकनर,

* प्राध्यापक वेस्टमिनिस्टर जॉन ज्या डोंगरमाथ्यावरून शेवटी दिसले तो डोंगरमाथा तसा काही दुर्गम नव्हता...

थोडक्यात चित्रफीतीची इतर उदाहरणे माझ्या तर्काला बळकटीच प्रदान करीत होती. ती आठवत मी थोडासा आत्मविश्वास परत मिळवला. राकेशची उत्कंठा माझ्या मौनामुळे वृद्धिंगत होत होती.

''प्रोफेसर साहेब, तुमची ती भन्नाट कल्पना केव्हा सांगणार आहात?'' एके ठिकाणी थांबत त्याने विचारले.

''भास्करन् हरवले ती जागा पाहिल्यावर'' मी शांतपणे उत्तरलो. तेव्हा जमिनीवर एक लहानशी काठी खोचून भोवताली लहानसे वर्तुळ काढलेली जागा दाखवत राकेश म्हणाला : ''हाच तो स्पॉट.''

हा सूर्य आणि हा जयद्रथ! आता मला, अर्जुनाला, पुढील कार्यवाही करायची होती.

या स्पॉटकडे येत असताना मला दोन परस्पर विरोधी भावना सतावीत होत्या. एकीकडे आपण एक अतिविचित्र सत्य पाहणार आहोत ही अपेक्षा तर दुसरीकडे अशा अवास्तव कल्पनेमागे धावण्यात आपण 'अवैज्ञानिक'पणा तर दाखवित नाही? राकेशसारख्या वास्तववादी माणसापुढे आता ही माझी एकप्रकारे परीक्षाच नव्हती का?

''उवाच पार्थ पश्यैतान् समवेतान् कुरूनिति''

अर्जुनाच्या सांगण्यावरून दोन्ही सैन्यांमध्ये रथ उभा करून कृष्णाने आवाहन केले ''पहा आता सगळ्या कुरू मंडळींना!'' तेव्हा अर्जुन पार ढेपाळला होता. आता मला राकेश म्हणत होता... ''तुमच्या सांगण्यावरून तुम्हाला इथे आणले; आता हे रहस्य उकला.'' आणि मी आतून ढेपाळलोय हे त्याला कळता कामा नये.

मी तज्ज्ञाचा आव आणत ती जागा तपासली आणि त्यातील एक वर्गाकार भाग निवडला- एक मीटर बाय एक मीटरचा. कारण तेथे जास्त पाऊलखुणा दिसत होत्या. सुदैवाने पोलिसांनी फिती लावून त्या जागेवरची वर्दळ थांबवली होती. अजून माझी ती विचित्र कल्पना (आता प्रत्यक्षात मला तो शुद्ध वेडेपणा वाटत होता) मांडायला मी कचरत होतो. पण तिची सुरुवात एका विज्ञानाधिष्ठित नियमाने भक्कमपणे करावी असे मी ठरवले.

''जेव्हा एखाद्या जागेतून पादचाऱ्यांची वर्दळ असते तेव्हा कुठल्याही आकाराच्या एका बंद रेषेने घेरलेल्या आकृतीतून जितकी पाऊले आत जाताना दिसतात तितकीच बाहेर जाणारी पण'' मी प्राध्यापकी आव आणून उद्गारलो.

''आले लक्षात'' किंचित विचार करून राकेश म्हणाला. ''पण या तुमच्या प्रमेयाचे इथे प्रयोजन काय?''

''ही आकृती पहा! या चौकोनात आत शिरणारी पाऊले पुष्कळ दिसतात पण बाहेर पडणारी? ती कमी वाटतात नाही का?'' मी स्मित करत म्हणालो.

''ते खरेच. पण प्रोफेसर साहेब, एक वेगळा पर्याय तुम्ही विसरलात. जर चौकोनात शिरलेली व्यक्ती उडी मारून चौकोनाबाहेर पडली तर तिची बाहेर जाणारी पाऊले चौकोनाच्या सीमारेषेला छेद देणार नाहीत.''

''अगदी बरोबर कल्पना! पण मी हा पर्याय विसरलो नसून एका वेगळ्या संदर्भात वापरणार आहे'' मी उत्तरलो. भास्करन् कसे गायब झाले हे सांगण्याऐवजी मी कसल्या गणितीय कल्पनांमध्ये स्वत:ला (आणि त्याला देखील!) गुरफटून घेत आहे असे त्याला वाटले असावे. निदान तसा भाव मला राकेशच्या चेहऱ्यावर दिसला.

''जरा सबुरीने घे. मी मुद्द्याकडे येतो. पण त्याआधी एक प्रयोग करून पाहतो. तो यशस्वी झाला तर माझी मूळ कल्पना सांगेन.'' मी म्हणालो.

''आणि प्रयोग फसला तर?''

''तर बॅक टु स्क्वेअर वन्''

मी उत्तरलो. का ते सांगता येत नाही पण माझा आत्मविश्वास आता वाढला होता.

मी त्या चौकोनात उतरलो. आणि हळू आवाजात हाका मारायला सुरुवात केली.

''डॉ. भास्करन्! डॉ. भास्करन्?''

''हॅलो भास्करन्... हाय भास्करन्...''

''भास्... हाय भास व्हेअर आर यू?...''


राकेश माझ्याकडे असा पाहात होता जणू मला वेड लागले आहे. मी आवाज किंचित चढवून हाका मारणे चालू ठेवले. कुठल्या एका दिशेकडे हे नसून मी दिशा बदलत होतो.

''कुठून तुम्हाला प्रतिसाद अपेक्षित आहे?'' सगळीकडे नजर टाकीत राकेशने विचारले. आजूबाजूला, माझ्या सुदैवाने माणसांची वर्दळ नव्हती.

खुणेने राकेशला गप्प रहायला सांगून मी प्रयत्न चालू ठेवले. मला यश मिळालेच पाहिजे- दुसरा पर्याय नव्हता. राकेशसारख्या त्रयस्थाने मला वेड्यात काढले तरी मी हाका मारीत राहणार...

सुमारे ४-५ मिनिटांनी मला मंद स्वरात पण स्पष्ट शब्द ऐकू आले : ''मी भास्करन् बोलतोय... तुम्ही कोण?'' ते ऐकून माझा जीव भांड्यात पडला, तर तिकडे राकेशने आश्चर्याचा 'आ' केला.

कारण भास्करन् दिसत कुठेच नव्हते. पण त्यांचे बोलणे, ते समोर उभे राहून संभाषण करत आहेत असे वाटावे. आणखी एक विलक्षण बाब! तो आवाज नेमका कुठल्या दिशेकडून येत आहे हे सांगणे कठीण होते.



श्रावण गुरव

मी या सर्व बाबींचा जास्त विचार न करता वार्तालाप चालू ठेवला : ''मी काटकर. विजय काटकर... तुझा दोस्त. अरे तू आहेस कुठे? तू अदृश्य झालास म्हणून इथे काय गोंधळ माजलाय.''

''हाय, विजय! मी इतकी महत्त्वाची व्यक्ती असेन असे वाटले नव्हते! बरं, मी आहे कुठे ते माझे मलाच ठाऊक नाही. अरे, किड्नॅप केलेल्या किड्ला आपल्याला कुठे ठेवलेय ते माहीत असते का?'' भास्करन् म्हणाले.

''म्हणजे तुला किड्नॅप केले गेले?''

''होय, मी फिरायला जाताना एका ठिकाणी तिघेजण एकदम आले व मला अलगद उचलून घेऊन आले. कसे ते मला कळले नाही. एक अल्पकाळ-मला वाटते दोन तीन मिनिटांचा असेल तो- सगळीकडे अंधारच अंधार. पुन्हा उजाडलं तर मी या इथे. इथे म्हणजे कुठे? ते मी सांगू शकत नाही पण तुझ्या आवाजावरून तू इथून फार लांब नसावास.''

इतक्या जवळ तरी इतका दूर!

हे कोडे माझ्या भन्नाट कल्पनेने सुटत होते. तरी मला भास्करन्‌कडून आणखी काही जाणून घ्यायची इच्छा होती. मी त्याला बोलते करायला विचारले "बरं तू आहेस ती जागा कुठली आहे?"

"अगदी वेगळी... मी एखाद्या परग्रहावर आलोय असे वाटते; पण इतक्या कमी वेळात ते कसे शक्य झाले? इथले लोक वेगळी भाषा बोलतात, वेगळे कपडे घालतात, वेगळ्या प्रकारच्या घरात राहतात. काही बाबतीत ते आपल्या पुढे गेलेत तर काही बाबतीत नाही. मला उचलून आणले ते माझ्याकडून काहीतरी शिकायला..."

माझा तर्क बरोबर ठरला. पृथ्वीवरच्या कर्तबगार, सृजनशील व्यक्तींना 'किडनॅप' करायचे कारण हेच. त्यांच्याकडून त्यांचे संशोधन शिकून घ्यायला. भास्करन् पुढे सांगत होता –

"माझ्या शोधकार्याबरोबरच एकंदर माझ्या कार्यक्षेत्राबद्दल जाणून घ्यायची त्यांना फार उत्सुकता आहे. प्रथम मी पूर्वी घेतलेल्या गुप्ततेच्या शपथेचे कारण पुढे करून नकार दिला, तर हे लोक म्हणाले की ती शपथ पृथ्वीपर्यंत मर्यादित होती आणि त्यांचा स्वतःचा पृथ्वीवर कसलेही आक्रमण–अतिक्रमण करायचा इरादा नव्हता. त्यांनी तसे शपथेवर सांगितल्यावर मी त्यांना लेक्चर्सच्या स्वरूपात माझा विषय समजावून सांगतोय..."

"अरे पण भाषेच्या अडसराचे काय? तू त्यांच्याशी बोलतोस कसा?" मला भेडसावणारी शंका मी मांडली.

"त्यांनी इंग्रजी आणि काही इतर भाषा शिकून घेतल्यात. त्यामुळे त्यांचे माझे संभाषण, लेक्चरबाजी आदी इंग्रजीतून चालते. पण त्या व्यतिरिक्त–आणि या क्षेत्रात ते आपल्या पुढे आहेत– मला परत सोडण्यापूर्वी ते माझी प्रतिकृती काढून ठेवणार. आपण झेरॉक्स मशीनवर कॉपी करतो त्याप्रमाणे. म्हणजे मी परत गेल्यावर त्यांना आलेल्या शंकांचे निराकरण माझी कॉपी करेल."

म्हणजे 'परत येणे' हा देखील नियोजित प्रकार होता. अशा काही तज्ज्ञांना पळवून आणून, त्यांच्याकडून शिकून, नंतर त्यांची प्रतिकृती काढून मग त्यांना सुखरूप परत सोडणे हा कार्यक्रम शिस्तीत राबवला जात होता. पूर्वी पळवलेले तज्ज्ञ लोक असेच परत आले होते. पण आपली या ठिकाणची स्मृती गमावून. मी त्याबद्दल भास्करन्‌ला विचारले.

"त्यांच्या कॉपी करण्याच्या पद्धतीत ही तरतूद केली गेलीय." त्यांनी खुलासा केला. "या ठिकाणी काय घडले हे अजिबात पृथ्वीवर कळता कामा नये म्हणून ही खबरदारी."

"म्हणजे मला आत्ता तुझ्याकडून मिळते आहे ती माहिती त्यांच्या खबरदारीला डावलून मिळते आहे!" मी हसून उत्तरलो.

"मलाही हे आश्चर्य आहे. तुला माझा सुगावा लागला कसा? आणि आपण इतक्या सहजगत्या हे संभाषण चालू ठेवू तरी कसे शकलो? ही उत्तरे मला पाहिजेत पण आत्ता मी आवरते घेतो कारण आता माझ्या क्लासची वेळ झाली."

भास्करन्‌शी संबंध तुटला. आता परत केव्हा योग येतो ते बघूया. तो पृथ्वीवर परतल्यावर या बाबतीत काही जाणून घेता येणार नाही कारण तो 'सर्व काही' विसरून परत येणार. तेव्हा शक्य झाल्यास पुन्हा प्रयत्न करायचाच तो 'तिथे' असेपर्यंत.

इतका वेळ राकेश माझ्या शेजारी उभा राहून सर्व काही शांतपणे ऐकत होता. त्याला आता वाचा फुटली. "काय गंमत आहे काटकर साहेब! ते बोलणे इतके स्पष्ट होते की मला वाटले भास्करन् साहेब पंधरावीस फुटांवर आहेत. पण कुठे? त्यांचा आवाज नेमक्या कुठल्या दिशेने येत होता ते मला सांगता आले नाही. कृपया खुलासा करा. ज्या अर्थी तुम्ही मला मुद्दाम या ठिकाणी घेऊन आलात, मला अशक्य वाटेल अशी किमया तुम्ही–भास्करन्‌शी संपर्क साधण्याची– साध्य केलीत, त्या अर्थी तुम्हाला हे रहस्य उकलले आहे. तसे असेल तर माझ्या–इन ॲड्व्हान्स– अभिनंदनपर शुभेच्छा! बट प्लीज एन्‌लायटन् मी!"

राकेशशी शांतपणे बोलता यावे म्हणून मी म्हटले "चल इथेच थोडे चालूया. वर्दळ वाढण्यापूर्वी मी तुला माझा तर्क सांगतो." आम्ही दोघे समुद्राकाठच्या रस्त्यावरून चालू लागलो. मी म्हटले–

"राकेश, भास्करन् तसेच इतर मंडळी एखाद्या जागेवरून एकाएकी नाहीशी झाली आणि त्यापैकी जी परतली ती त्याच ठिकाणी एकाएकी उपस्थित झाली हा तपशील मला महत्त्वाचा वाटला. हे अपहरणाचे प्रकार असते तर त्या व्यक्तीला घेऊन जाताना, तिच्या अपहरणकर्त्यांना कोणी पाहिले नाही हे कसे काय घडते?

"मी या प्रश्नाचा विचार करीत असताना मला तुझ्या खोलीत मुंग्यांची रांग दिसली. रांगेतली मुंगी ठराविक ठिकाणापर्यंत जाऊन अदृश्य होत होती. आणि त्यामुळे मुंग्यांची रांग छोटी होत चालली होती." मी सावकाश बोलत होतो तरी उतावीळपणे राकेशने तेच गाडे वेगाने पुढे ढकलायचा प्रयत्न केला : "होय कारण त्या ठिकाणी फरशीत त्यांचे बीळ असणार."

"एक्झॅक्टली!" मी उद्गारलो. "त्या उदाहरणाने मला एक वेगळा पर्याय सुचवला..."

"तुम्हाला असे म्हणायचेय का की भास्करन् समुद्रकाठी एका विहिरवजा बिळात पडले?" परत आपली गाडी दामटत राकेशने विचारले.

"होय आणि नाही. मी खुलासा करतो पण जरा दमाने घे. मी गडबडीत सर्व सांगितले तर पुढे तूच तक्रार करशील की माझी ही कारणमीमांसा तुझ्या डोक्यावरून गेली." मी जरी सौम्यपणे बोललो तरी त्यामागची खोच राकेशला जाणवली. हात वर करून त्याने होकार व्यक्त केला तेव्हा त्याची चर्या ओशाळलेली होती. मी पुढे म्हणालो :

"धन्यवाद, राकेश! तर तुझ्या प्रश्नाचे उत्तर 'होय', ते एक बीळ होते पण आपल्याला परिचित असलेल्या प्रकारचे नव्हते..."

राकेशच्या प्रश्नांकित चेहऱ्याकडे पाहून मी स्मित करत म्हणालो "ते कशा प्रकारचे बीळ होते हे समजून घेण्यासाठी एक उदाहरण देतो. ते आहे एखाद्या अनेक मजली इमारतीचे. अशा इमारतीत प्रत्येक मजल्यावर लोक राहतात, काम करतात. पण प्रत्येक मजल्याचे काम वेगळे चालते. जर तिसऱ्या मजल्यावरच्या व्यक्तीला दुसऱ्या मजल्यावरच्या व्यक्तीला भेटायचे असेल तर तिने काय करावे? लिफ्ट किंवा जिना वापरून ती खाली जाऊ शकेल. अशा स्थितीत तिसऱ्या मजल्यावरच्या इतरांना ती व्यक्ती नाहीशी झाल्यासारखी असते तर दुसऱ्या मजल्यावर ती अकस्मात् प्रकट होते. अर्थात् सध्याच्या जीवनक्रमात अनेक मजली उत्तुंग इमारतीत हे पुष्कळदा घडत असते पण आपल्याला त्यात अनाकलनीय असे काही वाटत नाही.

"तर या उदाहरणात जिना किंवा लिफ्ट हे दोन मजल्यांना जोडणाऱ्या

'बिळा'चे काम करतात. आता हेच उदाहरण थोडे विस्तारून आपल्या सध्याच्या परिस्थितीसाठी वापरू.''

''मजल्यांच्या उदाहरणात आपण हिंडतो फिरतो ते दोन मितीत. अमुक फ्लॅटचे क्षेत्रफळ १२० स्क्वेअर मीटर आहे असे विधान करताना आपण त्याची लांबी-रुंदी विचारात घेतो. उदाहरणार्थ या फ्लॅटची लांबी १२ मीटर व रुंदी १० मीटर असू शकेल. आपल्या दैनंदिन हालचाली या १२ X १० क्षेत्रफळात होतात. आणि इथे दोन मिती, लांबी व रुंदीच्या दिशेने असतील.

''आता आपण पृथ्वीवर वावरतो असे म्हटले तर आपल्या सर्व हालचाली तीन मितींच्या अंतराळात घडतात. लांबी, रुंदी आणि उंची अशा तीन परिमाणांनी आपण त्या तीन मिती दर्शवतो. हे सर्व अर्थात पटण्याजोगे आहे. पण येथून पुढे आपली कल्पना-शक्ती वापरूया. समजा आपण राहतो ते तीन मितीचे अंतराळ म्हणजे एका वैश्विक इमारतीचा एक मजला- समजा तिसरा मजला आहे. आणि असाच एक दुसरा मजला अस्तित्वात आहे. जर आपल्याला इथून तिथे जायचे असेल तर तिसरा मजला आणि दुसरा मजला यांना जोडणारे लिफ्ट किंवा जिना लागेल.''

''आले लक्षात!'' उत्तेजित स्वरात राकेश म्हणाला. ''म्हणजे जर असे बीळ किंवा लिफ्ट मिळाले आणि त्यामार्गे दुसऱ्या मजल्यावरच्या लोकांनी तिसऱ्या मजल्यावरच्या व्यक्तीचे अपहरण केले तर तिसऱ्या मजल्यावरच्यांना ती व्यक्ती आपल्या अंतराळात कुठेही सापडणार नाही.''

''अगदी बरोबर! आता तुझ्या लक्षात आलेच असेल की या तुझ्या फिल्ममध्ये दर्शवलेल्या व्यक्ती एका वेगळ्या अंतराळात गेल्या. तेथे काही काळ त्यांना ठेवून परत पाठवायचा क्रम त्या दुसऱ्या अंतराळातल्या लोकांनी गेली काही वर्षे चालवला आहे. त्याबद्दल खुद्द भास्करन् यांच्या तोंडून आपण ऐकले...''

''आणि तुम्ही भास्करन् यांच्याशी संपर्क साधलात तो या दोन अंतराळांना जोडणाऱ्या लिफ्ट नलिकेद्वारे'' मला थांबवत राकेश उद्गारला. हे कोडे असे अनपेक्षितरीत्या सुटताना पाहून राकेश भलता उत्तेजित झाला होता.

''मी असा अंदाज केला की जिथे भास्करन् अदृश्य झाले तिथेच असा जोडमार्ग असावा. तो अंदाज खरा ठरला. आणि सुदैवाने खुद्द भास्करन् दुसऱ्या टोकाला हजर होते.'' मी उत्तरलो.

''आणि स्मरणशक्ती नष्ट होणे... हे का घडते?'' राकेशने विचारले.

''मला वाटते अपहरणकर्ते त्या व्यक्तीला परत पाठवण्यापूर्वी त्याचा अपहरणकाळातला स्मरणसाठा नष्ट करतात. या बाबतीत ते नक्कीच आपल्यापेक्षा प्रगत आहेत.'' माझा तर्क मी त्याला सांगितला. आणि पुढे म्हणालो : ''आपल्या विश्वातली कर्तबगार माणसे उचलून नेऊन त्यांचा अभ्यास करायचा हा प्रयत्न दिसतोय.''

आता वरळी सी फेसचा भाग चांगला गजबजला होता. ''चला थोडा नाश्ता घेऊ'' असे म्हणत राकेश मला एका इराण्याच्या उपहारगृहात घेऊन गेला. तेथे गरम चहा आणि ऑम्लेट, ब्रेड बटरवर ताव मारता मारता मला विलक्षण झोप येऊ लागली. ते पाहून राकेश म्हणाला, ''चला आता तुम्हाला पुण्याला घरी सोडतो. फार वेळ घेतला तुमचा, पण कोडे उलगडले त्याबद्दल तुमचा खूप आभारी आहे.''

आमचे बिल राकेशने चुकते केले. तरीपण तिथला वेटर माझ्याकडे येऊन तगादा लावत होता ''साहेब फ्राइड फिश आणि कॉफीचे नव्वद रुपये झाले.''

मी त्याला सांगत होतो ''अरे बाबा, मी फिश कुठे ऑर्डर केली? मी ऑम्लेट खाल्ले त्याचे पैसे माझ्या मित्राने दिले नाही का?''

तरी बेटा ऐकेना आणि माझे खांदे हलवीत म्हणाला, ''साहेब, जागे व्हा... आता दापोडी स्टेशन येऊन गेले. आपण गाढ झोपला होतात म्हणून इतका वेळ उठवले नाही...''

खरोखरचं मी आता जागा झालो आणि १०-१२ सेकंदात पूर्ण शुद्धीवर आल्यावर माझी खात्री झाली की मी डेक्कन क्वीनमध्ये आहे. होय, मी फिश घेतले होते. वेटरला धन्यवादासकट शंभर रुपयांची नोट देऊन मी उतरायच्या तयारीला लागलो. शिवाजीनगर स्टेशनवर उतरणाऱ्यांचा क्यू तयार झाला होता त्यात मी सामील झालो.

पण मन अस्वस्थ होते! मला खऱ्यासारखा वाटणारा अनुभव सर्वस्वी स्वप्नातला होता. राकेश ही व्यक्ती काल्पनिक होती. पण भास्करन्चे काय? तो अदृश्य झाला होता हे सत्यसृष्टीतले वृत्तपत्र सांगत होते. मी ते पुन्हा पाहून, वाचून खात्री केली. त्या ठळक घटनेतून मला स्वप्नात एका वेगळ्याच घटनाक्रमाचा अनुभव झाला होता.

पण मग भास्करन्चे खरोखर काय झाले? आता दुसऱ्या कोणाच्या शब्दावर अवलंबून न राहता मी खुद्द भास्करन्लाच 'पकडायचे' ठरवले. माझ्या मोबइलवर त्याचा नंबर होता. शिवाजीनगरवर मला न्यायला आलेल्या गाडीत बसल्यावर मी त्या नंबराची बटणे दाबली.

फोन वाजत होता. भास्करन् उत्तर देईल का? बऱ्याच घंटा वाजल्यावर मी आशा सोडून दिली तेव्हाच भास्करन्चा खणखणीत आवाज ऐकू आला ''कोण, काटकरच ना? मला माहीत आहे तू का फोन केलास ते. माझ्या तथाकथित नाहीश्या होण्याबद्दल ना?''

''होय! सांग काय झालं ते...'' मी उत्कंठेने विचारले.

''अरे तुला माहीत आहे ना की हे बुद्धू सरकार माझ्याकरता सुरक्षेचे कवच उभे करू पाहतेय...''

''पण तू त्याला ठाम नकार दिला होतास, नाही का?''

''होय आणि तेव्हा... म्हणजे पाच महिन्यांपूर्वी... सरकारने आपला आग्रह मागे घेतला होता. अलीकडे टेररिझम्‌मध्ये वाढ झाली या सबबीवर सरकारने माझा विरोध न जुमानता मला या सुरक्षेच्या जाळ्यात पकडले. तेव्हा त्यांना धडा शिकवायला मी एकदम नाहीसा झालो. पहाटेच्या माझ्या चालण्यात एक मोठा खडक येतो. त्यामागे मी बरोबर आणलेले वेशांतर चढवले. कल्लेदार मिशा लावल्या. छोटीशी दाढी आणि वर पगडी आणि भास्करन्चा भास्करपाल सिंह-एक सरदारजी झालो. या आपल्या मुंबईत कुठल्याही प्रांताचा, धर्माचा माणूस खपून जातो. माझे गुप्तरक्षक लांबून पाहात होते पण त्यांना हा बदल कळला नाही. पुढे मी त्यांच्या अगदी जवळून गेलो तरीही! मी नाहीसा झालो, तो एखाद्या समांतर विश्वात गेलो असे तर नाही ना तुला वाटले?''

मी काही न बोलता माझा सेलफोन बंद केला.

***


**डॉ. जयंत नारळीकर**
आयुका, पोस्ट बॅग नं. ४
गणेश खिंड
पुणे-४११००७